तपासिक

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. District (जिल्हा): रत्नागिरी  P.S.(ठाणे): संगमेश्वर  Year (वर्ष): 2019

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0070  Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 17/07/2019 13:29 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):

1. Day(दिवस): दरमियानी दिन
   Time Period (कालावधी):

Date From (दिनांक पासून): 16/07/2019
Date To ( दिनांक पर्यंत): 17/07/2019
Time From (वेळेपासून): 16:59 बजे
Time To (वेळेपर्यंत): 13:07 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
Date (दिनांक ): 17/07/2019  Time (वेळ): 13:07 बजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ
Entry No. (नोंद 019  Date & Time (दिनांक आणि वेळ): 17/07/2019 13:07 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्तळ):

1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): उत्तर, 22 किमी
Beat No. (बिट क्र.):

(b) Address (पत्ता): मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालय , संगमेश्वर ,संगमेश्वर , 415611

(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): अब्दुल लतिफ महम्मद इसाक काजी

(b) Father's Name (वडील का नाव) : महम्मद इसाक कजी

(c) Date/Year of Birth (जन्म 1940  (d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):  Date of Issue (अदा केल्याची तारीख):
Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):

(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | इतर | 324964669849 |

(h) Address (पत्ता):

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 307,चौथा माळा ए विंग,डॉंजोशी हॉस्पीटलचे पाठीमागे ,मार्कडी ,चिपळुण ,संगमेश्वर,रत्नागिरी, महाराष्ट्र,415605,भारत |
| 2 | स्थायी पता | कडवई मोहला,संगमेश्वर ,संगमेश्वर,रत्नागिरी,महाराष्ट्र,415611,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9137599161

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अजय यशवंत तांबे | | पती का नाम : यशवंत तांबे | 1. मंडळ अधिकारी मुरडव,संगमेश्वर , संगमेश्वर,रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री विश्वंभर पंडीत मुरकुटे | | वडील का नाम : पंडीत मुरकुटे | 1. तलाठी सजा तुरळ ,संगमेश्वर , संगमेश्वर,रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

लागलीच.

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 4,000 रु. त्यामध्ये 500 रु.दराच्या 8 चलनी नोटा. | 4,000.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2000 रु.500 रु.दराच्या 4 नोटा. | 2,000.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 900 रु. 500रु.ची. 1 चलनी नोट व 200 दराच्या 2 चलनी नोटा. | 900.00 |
| 4 | इतर | कच्चा माल | 00.00 / रु. किंमतीचे मंडळ अधिकारी तांबे यांच्या अंगावरील निळ्या सफेद व फिक्कट हिरवट चौकटी रं | 0.00 |
| 5 | इतर | कच्चा माल | 00.00/ रु. किंमतीचे तलाठी मुरकुटे यांच्या अंगावर निळ्या सफेद व चॉकलेटी रंगाचे उभ्या लायन | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 6,900.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

1)फिर्यादीचे नाव व पत्ता- अब्दुल लतिफ महम्मद इसाक काझी वय-79 वर्षे व्यवसाय -सेवानिवृत्त मुळ गाव कडवई मोहला ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी सध्या रा. प्लॅट नंबर 307 ,चौथा माळा ए विंग डॉ.जोशी हॉस्पीटलचे पाठीमागे मार्कंडी ता.चिपळुण जि.रत्नागिरी मो.नं -9137599161 आधारकार्ड नंबर- 324964669849 2)आरोपीचे नाव व पत्ता - लोकसेवक 1)अजय यशवंत तांबे वय -55 वर्षे,मंडळ अधिकारी मुरडव,ता.संगमेश्वर जि.रत्नागिरी 2)श्री विश्वंभर पंडीत मुरकुटे वय-32 वर्षे, तलाठी सजा तुरळ ता.संगमेश्वर जि रत्नागिरी 3)गुन्हा घडला तारीख वेळ ठिकाण-दिनांक-16/07/2019 रोजी 16.59 वा. चे दरम्याने मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालय मुरडव ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी .4)लाचेची मागणी केलेली रक्कम-1) 4,000/- मंडल अधिकारी तांबे यांनी मागणी केलेली रक्कम. 2) 2000/- तलाठी मुरकुटे यांनी मागणी केलेली रक्कम. एकुण- 6000/-5)जप्त मुद्देमाल - 1) 4,000 /-रु. त्यामध्ये 500 रु.दराच्या 8 चलनी नोटा. 2) 2000 /- रु.500 रु.दराच्या 4 नोटा. 3) 900 /- रु. 500/- रु.ची. 1 चलनी नोट व 200 दराच्या 2 चलनी नोटा. 4) 00.00 /- रु. किंमतीचे मंडळ अधिकारी तांबे यांच्या अंगावरील निळ्या सफेद व फिक्कट हिरवट चौकटी रंगाच्या हाफ बाहीचा शर्ट अँन्थासिन पावडर लागलेली. 5) 00.00/- रु. किंमतीचे तलाठी मुरकुटे यांच्या अंगावर निळ्या सफेद व चॉकलेटी रंगाचे उभ्या लायनिंगच्या चौकडी फुल बाहीचा शर्ट अँन्थासिन पावडर लागलेली.एकुण - 6900/-4)हकीगत- वरील तारखेस वेळी व जागी यातील फिर्यादी

यांच्या मयत आईच्या नावे असलेल्या जमीनीचा हिस्सा व त्यांचा मयत भाऊ यांचे वारसांच्या नावे सदर जमीनीच्या सातबारा उता-यावर लावण्याकरीता आरोपीत नं.1 यांनी 4,000/- रु. व आरोपीत नं.2 यांनी 2000/- रु. लाचेची मागणी केल्याचे दिनांक-16/07/2019रोजी पडताळणीमध्ये आढळुन आले. पडताळणीमध्ये निष्पन्न झाले नुसार मडंळ अधिकारी व तलाठी कार्यालय मुरडव ता.संगमेश्वर येथे सापळा आयोजीत केला असता फिर्यादी  यांचेकडुन आरोपीत नं.1 यांनी 4000/- रुपये व आरोपीत नं.2यांनी 2000/- रुपये दिनांक-16/07/2019 रोजी 16.59 वा. असे एकुण 6900/- रुपये पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले. म्हणुन वरीलप्रमाणे फिर्यादी यांनी दिले फिर्यादीवरुन गुन्हा रजिस्टरी दाखल करण्यात आलेला आहे.तरी सदर बाबत पोनि श्री. प्रविण कदम लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी यांचेकडे जा,क्र. एसीबी/रत्नागिरी /गुन्हा /1062/2019 दि.17/17/2019 रोजी पोलीस उपअधिक्षक यांचे कार्यालय रत्नागिरी यांनी दिले रिपोर्टवरुन गुन्हा दाखल करुन जाहीर रिपोर्ट मा. अतिरीक्त सत्र व विशेष न्यायाधिश सो. रत्नागिरी यांना रिपोर्ट सादर करीत आहोत.  वरीष्ठांना बिनतारी संदेश पाठविण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोनि श्री. प्रविण कदम लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी हे करीत आहेत.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Uday Jaikumar Zaware(I (Inspector)) / DGPUJZ69M01 **or**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** **Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाम):** Uday Jaikumar Zaware
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPUJZ69M01

पोलिस स्टेशन ऑफीसर
संगमेश्वर पोलिस ठाणे

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

# फिर्यादी जबाब

दिनांक १७/०७/२०१९

मी अब्दुल लतीफ मोहम्मद इसाक काझी, वय-७९ वर्षे, व्यवसाय-सेवानिवृत्त, गुळगांव कडवई मोहल्ला ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी, सध्या रा. प्लॅट नं. ३०७, ४ था मजला, ए विंग, डॉ. जोशी हॉस्पिटलचे पाठीमागे, मार्कंडी ता. चिपळूण जि. रत्नागिरी मो. नं. ९१३७५२९१६१ फिर्याद लिहून देतो की,

मी परदेशामध्ये नोकरीस होतो. गेल्या सुमारे १५ वर्षांपुर्वी सेवानिवृत्त होवुन चिपळूण येथे वास्तव्यास आहे. तुरळ गावात सर्व्हे नं. २७/४, ३७/२, ३३/६, ३३/५ ही वडीलोपार्जीत जमिन माझी मयत आई अमीनाबी मोहम्मद इसाक काझी व माझे नांवे संयुक्तिक आहे. सदरची जमिन शासनाने मुंबई गोवा महामार्गाचे रुंदीकरणाकरीता अधिग्रहण केली आहे. माझी आई दिनांक १५/०८/१९९४ रोजी मयत झाली असल्याने आईच्या नावे असलेला हिस्सा माझा व माझे मयत भाऊ अब्दुल कादीर इसाक काझी यांचे वारस १) मुलगा-दानिश अब्दुल कादीर काझी, २) मुलगा- राहत अब्दुल कादीर काझी व ३) पत्नी-नसरिन अब्दुल कादीर काझी यांचे नावे मी करु इच्छित होतो. त्यामुळे मी माझे आईचे नांव सदर सातबारा वरुन कमी होवुन माझे व माझ्या मयत भावाचे वारसांचे नावे सातबारा सदरी नोंद होण्याकरीता मागील सुमारे दोन वर्षांपासुन सर्कल व तलाठी कार्यालय आरवली, ता.संगमेश्वर येथे भेट देत होतो. तसेच त्याबाबतचा रितसर अर्ज मी माहे डिसेंबर २०१८ मध्ये तलाठी सजा तुरळ, ता.संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांचे नांवे दिला होता. त्यानंतर मे २०१९ या महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये सर्कल व तलाठी कार्यालय आरवली, ता.संगमेश्वर याठिकाणी भेट दिली असता माझे वारस तपासाचे काम पुर्ण करुन देण्यासाठी तेथील सर्कल ऑफिसर श्री.तांबे यांनी माझेकडे रुपये ४,०००/- व तलाठी श्री. मुरकुटे यांनी माझेकडे रुपये २,०००/- ची मागणी केली. त्यानंतर पुन्हा दि. ०८/०७/२०१९ रोजी मी सदर कार्यालयात गेलो असता तलाठी श्री. मुरकुटे यांनी माझे वारस तपासाचे काम पुर्ण करुन देण्यासाठी पुन्हा रुपये २,०००/- ची मागणी केली. सर्कल ऑफिसर श्री. तांबे व तलाठी श्री. मुरकुटे हे माझे वारस तपासाचे काम पुर्ण करुन देण्यासाठी मागत असलेली रक्कम ही लाच म्हणुन मागत असल्याची माझी खात्री झाल्याने मी दि. ०९/०७/२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी फोनव्दारे संपर्क साधुन तेथील अधिकारी श्री. कदम साहेब यांना सदरची तक्रार सांगीतली होती. माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १९/०७/२०१९ रोजी मी खाजगी वाहनाने आरवली येथे येवुन पोलीस निरीक्षक कदम यांची भेट घेतली. पोनि कदम यांनी त्यांचे सोबत असलेले पंच व असीबी स्टाफची ओळख करुन दिली. मी माझे नांव गांव सांगुन माझी ओळख सांगितली. त्यानंतर माझे तक्रारीची थोडक्यात हकीगत सांगितली व माझे स्वःहस्ताक्षरातील इंग्रजीमध्ये लिहुन आणलेली तक्रार त्यांचे समक्ष हजर केली. त्या तक्रारीतील मजकुराचा मराठी अनुवाद पोनि कदम यांनी केला. पंचांनी माझा तक्रार अर्ज वाचुन स्वतःच्या स्वाक्षऱ्या करुन त्यावर पो.नि. कदम यांनी समक्ष म्हणुन स्वतःची स्वाक्षरी केली. तक्रार अर्ज पोलीस निरीक्षक कदम यांनी ताब्यात घेतला.

संगमेश्वर पोलिस ठाणे गुन्हा रजि नं 70/2019 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 (सुधारणा कायदा- 2018) चे कलम 7.

पोलिस स्टेशन ऑफीसर
संगमेश्वर पोलिस ठाणे

त्यानंतर मी पोनि कदम यांना सर्कल ऑफीसर तांबे व तलाठी मुरकुटे हे मुंबई गोवा हायवे लगतचे सर्कल व तलाठी ऑफिस, आरवली येथे भेटतील असे सांगितले. त्यावेळी पोनि कदम यांनी माझ्या तक्रारीची पडताळणी मला पंचासह सर्कल व तलाठी कार्यालय आरवली येथे पाठवुन करण्यात येणार असल्याचे व सदर भेटीदरम्यान माझेत तसेच सर्कल तांबे व तलाठी मुरकुटे यांचेतील संभाषण डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे पोनि कदम यांनी पंचाना व मला सांगितले.

समक्ष

(प्रविण कदम)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

(अब्दुल लतीफ काझी)

पोनि कदम यांनी माझ्या खाजगी वाहनात डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व नविन सिलबंद मेमरी कार्ड हजर केले. पोनि कदम यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये मेमरीकार्ड घालुन त्यामध्ये अगोदरचे काहीही संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले नाही याबाबत पंचांची खात्री करून दिली. त्यानंतर पोनि कदम यांनी स्वत:चे, माझे व पंचांचे पडताळणीसाठी जात असल्याचे निवेदन डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले.

पोनि कदम यांनी मला व पंच नं. १ इंदुलकर यांना तांबे व मुरकुटे यांची भेट झाल्यानंतर पुन्हा मुंबई गोवा हायवेवरील आरवली येथे परत येण्याच्या सुचना दिल्या होत्या त्यानंतर पोनि कदम यांनी दोन वेळा डिजिटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो माझ्या शर्टच्या आत बनियनमध्ये लपवुन पडताळणी कामी सर्कल व तलाठी कार्यालय आरवली येथे पाठविले होते. परंतु दोन्ही वेळेला सर्कल तांबे अथवा तलाठी मुरकुटे यांची भेट झाली नाही.

सर्कल तांबे यांचा मोबाईल नंबर माझ्याकडे असल्याने व त्यांना फोन केला तर ते कार्यालयात कधी येतील ते समजुन येईल असे मी पोनि कदम यांना सांगितल्याने पडताळणी पथक खाजगी वाहनाने मुंबई गोवा हायवेवरील तुरळ फाटा येथुन कडवई गावाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत निर्जन स्थळी आलो. त्यावेळी पोनि कदम यांच्या सुचनेप्रमाणे माझ्या मोबाईलचा स्पिकर ऑन करुन माझा मोबाईल नं. ९१३७५९९१६१ वरून सर्कल तांबे यांचा मोबाईल नं. ९८६०६१४३१९ वर मी फोन केला. त्यावेळी सर्कल तांबे यांनी उदया सकाळच्या दरम्यान फोन लावा आणि मग ठरवू असे मला सांगितले. सदरचे संभाषण पोलीस निरीक्षक कदम यांनी डीजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन रेकॉर्डींग केले. सर्कल तांबे यांनी उदईक रोजी सकाळी ०९.०० वा. फोन करा असे सांगितल्याने पुढील कारवाई उदईक दिनांक १६/०७/२०१९ रोजी करण्यात येणार असल्याने संपर्कात राहणेबाबत व गोपनियता राखणेबाबत पोनि कदम यांनी सांगितले. त्यानंतर मी खाजगी वाहनाने तेथुन माझे घरी निघुन गेलो.

दिनांक १५/०७/२०१९ रोजी सर्कल ऑफीसर तांबे यांची त्यांचे कार्यालयात भेट न झाल्याने त्यांना त्यांचे मोबाईल फोनवर कॉल केला होता. तेव्हा सर्कल ऑफीसर तांबे यांनी उदया सकाळी ०९.०० वाजता मोबाईलवर कॉल करण्यास सांगितले होते. त्यानुसार आज मंगळवार दिनांक १६/०७/२०१९ रोजी सावर्डे ता. चिपळुण येथील गुहागरकडे जाणाऱ्या रोडवर मी खाजगी वाहनाने येवुन पोलीस निरीक्षक कदम यांची सकाळी १०.१० वाजता भेट घेतली. सर्कल तांबे यांना त्यांचे मोबाईवर संपर्क करून आमचेमध्ये होणारे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकून ध्वनीमुद्रीत करणार असल्याचे मला व पंचाना पोनि कदम यांनी सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक कदम यांनी माझे खाजगी वाहनात डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये मेमरीकार्ड घालुन सर्कल तांबे व माझेमध्ये मोबाईलव्दारे होणारे संभाषण सदर मेमरीकार्डवर ध्वनीमुद्रीत करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी स्वत:चे, माझे व पंचांचे निवेदन डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर पोनि कदम यांनी मला व पंचाना सुचना दिल्या.

मी माझा मोबाईल नं. ९१३७५९९१६१ वरून सर्कल ऑफीसर तांबे यांचा मोबाईल नं. ९८६०६१४३१९ वर फोन केला. ती वेळ १०.२९ वाजताची होती. त्यावेळी पोनि कदम यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे आमचेतील मोबाईलवर झालेले संभाषण रेकॉर्डींग केले. सर्कल तांबे यांनी ते दुपारी बारा ते चार वेळेत ऑफिसमध्ये आहे असे मला सांगितले. मी त्यांना साडेबारा

(अविनाश कदम)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

(अब्दुल लतीफ काझी)

वाजेपर्यंत आलो तर चालेल का असे विचारले. असता त्यांनी या असे सांगितले. आगवेतील संभाषण संपल्यानंतर पोनि कदम यांनी रेकॉर्डर बंद केला. ती वेळ १०.३० वाजताची होती. त्यानंतर पोलीस निरीक्षक कदम यांनी रेकॉर्डर चालू केला त्यावेळी मी माझा व सर्कल तांबे यांचा आवाज ओळखला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक कदम यांनी सर्कल तांबे यांची समक्ष भेट घेण्याकरीता मला मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालय, आरवली येथे पाठविण्यात येणार असल्याचे सांगितले व पडताळणीबाबत सुचना दिल्या.

काहीवेळ सावर्डे येथे निर्जनस्थळी थांबुन त्यानंतर आम्ही सर्वजण खाजगी वाहनांनी मुंबई गोवा हायवेवरील आरवली येथील जिल्हा परिषद पुर्ण प्राथमिक मराठी शाळा आरवली नं. ३ येथे आलो पोलीस निरीक्षक कदम यांनी सर्कल तांबे यांची भेट झाल्यानंतर पुन्हा जिल्हा परिषद पुर्ण प्राथमिक मराठी शाळा आरवली नं. ३ येथे परत येण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक कदम यांनी डिजिटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझ्या शर्टच्या आत बनियनमध्ये लपविला ती वेळ १२.४८ वाजताची होती. मी व पंच नं. १ इंदुलकर असे माझे चारचाकी वाहनाने सर्कल तांबे यांची भेट घेण्याकरीता मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालय आरवलीकडे रवाना झालो. उर्वरीत पडताळणी पथक जिल्हा परिषद पुर्ण प्राथमिक मराठी शाळा आरवली नं.३ येथे खाजगी वाहनात थांबुन होते. मी व पंच इंदुलकर असे सदर कार्यालयात जावून प्रथम तलाठी मुरकुटे यांची भेट घेवून त्यांचेशी मी कामाविषयी चर्चा केली. कामाची चर्चा चालू असताना तलाठी मुरकुटे यांनी आमचे दोघांचे किती असे बोलून त्यांच्या हाताची ६ बोटे दाखवून पैशाची मागणी केली. त्यावर मी मुरकुटे यांना ६०००/- रूपये ना असे बोललो असता तलाठी मुरकुटे यांनी होय असे सांगितले. त्यानंतर मी सर्कल ऑफिसर तांबे यांना माझे कामासाठी भेटण्यास त्यांचे केबिनमध्ये गेलो असता तलाठी मुरकुटे हे ही तेथे आले. तेव्हा पुन्हा आमचेत कामाबद्दल व वारस तपासबाबत चर्चा झाली. त्यावेळी आता किती आणलेस ते द्या आता असे सर्कल ऑफिसर तांबे बोलले असता मी त्यांना तुमचे ४०००/- रूपये व यांचे २०००/- रूपये द्यायचे असे सांगितले. तेव्हा सर्कल ऑफिसर तांबे हे चार द्या चला असे बोलले. त्यानंतर मी व पंच नं. १ इंदुलकर असे पडताळणी पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. त्यावेळी पोनि कदम यांनी माझेकडील रेकॉर्डर ताब्यात घेवून बंद केला. ती वेळ १३.१६ वाजताची होती. पो.नि. कदम यांनी मला तलाठी मुरकुटे व सर्कल ऑफिसर तांबे यांचेशी आपले काय बोलणी झाली असे विचारले असता मी त्यांना सांगितले की, तुरळ गावातील जमीनीचे सातबारा उताऱ्यावरून माझ्या मयत आईचे नाव कमी करून माझे मयत भाऊ यांचे वारसांची नावे सातबारा उताऱ्यावर लावणेसाठी सर्कल ऑफीसर तांबे, यांनी रू. ४,०००/- व तलाठी मुरकुटे यांनी रू. २,०००/- लाचेची मागणी केली तसेच तलाठी मुरकुटे, यांनी रू. ६००/- ची जादा मागणी लागेल असे मला सांगितले.

सर्कल ऑफीसर तांबे, व तलाठी मुरकुटे यांनी लाच रक्कमेची मागणी केल्याने सापळा कारवाई लगेचच करणार असल्याचे व पडताळणी वेळेची स्क्रिप्ट नंतर बनविणार असल्याचे मला व पंचांना पोनि कदम यांनी सांगितले. तसेच सापळापुर्व कारवाई करण्याची गोपनीयता राखण्यासाठी दोन्ही वाहने संगमेश्वर दिशेने जावून काही अंतरावर मुंबई गोवा हायवेवरील एका निर्जनस्थळी जावून थांबविण्यात आली.

(प्रविण कदम)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

(अब्दुल लतीफ काझी)

काही वेळानंतर पोनि कदम यांच्या सुचनेवरुन मी लाचेची रक्कम रुपये ६,०००/- (रुपये सहा हजार) (त्यामध्ये रु. ५००/- दराच्या १२ भारतीय चलनी नोटा ) हजर केली. पोलीस निरीक्षक कदम यांच्या सुचनेवरुन मार्फत पंच नं. १ इंदुलकर यांनी अंगझडती घेतली. अंगझडतीत मिळुन आलेल्या चिजवस्तु व रोख रक्कम मला परत केली.

पोनि कदम यांनी माझे खाजगी वाहनात मला व पंचाना अल्ट्राव्हायलेट दिवा व अँन्थ्रासीन पावडर दाखवून त्याचे उपयोग व गुणधर्म समजावून सांगितले. पोनि कदम यांच्या सुचनेवरून मी हजर केलेल्या नोटांना पोलीस हवालदार ओगले यांनी अँन्थ्रासीन पावडर लावून सर्कल ऑफीसर तांबे यांना देण्यासाठी रू. ४,०००/- व तलाठी मुरकुटे यांना देण्यासाठी रू. २,०००/- असे दोन वेगवेगळया नोटाची घडी करुन माझ्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यावेळी पोनि कदम यांनी सर्कल ऑफीसर तांबे व तलाठी मुरकुटे यांनी लाच रक्कमेची मागणी करेपर्यंत व लाच रक्कम देण्याची वेळ येत नाही तो पर्यंत लाच रक्कमेला हात लावू नये असे मला सांगितले.

पडताळणी कारवाईचेवेळी तलाठी मुरकुटे यांनी जमिनीच्या कराच्या पावतीचे ९००/- रूपये द्यावे लागतील असे सांगितले असल्याने सदर रक्कम ९००/- रुपये (त्यामध्ये ५००/- रुपये दराची १ नोट व २००/- रुपये दराच्या २ नोटा) मी हजर केली. त्या नोटा माझ्या पॅन्टचे पुढील बाजुचे रिकाम्या खिशात ठेवल्या. त्यानंतर पोनि कदम यांनी सुचना दिल्या.

सापळापुर्व कारवाई पुर्ण झाल्यानंतर पोनि कदम यांनी सापळा आयोजित करणार असल्याचे सांगितले. तसेच मी सर्कल ऑफीसर तांबे व तलाठी मुरकुटे यांना लाच रक्कम देण्यासाठी भेट घेईन त्यावेळी आमच्यातील होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि.कदम यांनी स्वतःचे, माझे व पंचाचे निवेदन रेकॉर्डरमध्ये रेकॉर्डींग केले.

पोनि कदम यांनी रेकॉर्डर चालु करुन माझ्या शर्टच्या आत बनियनमध्ये लपविला. ती वेळ १६.०५ वाजताची होती. मी व पंच नं. १ इंदुलकर असे माझे खाजगी वाहनाने व सापळा पथक त्यांचेकडील खाजगी वाहनाने मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालय मुरबा आरवली येथे जाणेसाठी रवाना झालो. सापळा पथक मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालय मुरबा आरवली येथील परिसरात कोणासही संशय येणार नाही अशारितीने थांबुन होते. मी व पंच नं. १ इंदुलकर यांनी मुंबई गोवा हायवेचे लगतचे कार्यालया जवळ गाडी पार्क करुन वाहनातुन उतरुन पायी चालत मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालय मुरबा आरवली येथे गेलो. मी व पंच इंदुलकर असे सदर कार्यालयात जावून प्रथम तलाठी मुरकुटे यांची भेट घेवून त्यांचेकडुन माझे तुरळ गावाचे फेरफार व सातबाराचे उतारा दिल्यावर ती कागदपत्र मी माझे पॅन्टचे उजवे खिशात ठेवली व त्यांनी मागे सांगितलेप्रमाणे पावतीचे रूपये ९००/- तलाठी मुरकुटे यांचेकडे दिले. त्यावेळी त्यांनी पावती देतो असे सांगुन बराच वेळ काढला. काही वेळानंतर तलाठी मुरकुटे यांनी हाताचे खुणेने पैसे मागीतल्यावर त्यांनी पुर्वी मागितले प्रमाणे लाचेची रक्कम रू. २०००/- माझे शर्टचे डावे खिशातुन काढून त्यांचे समोर धरली असता त्यांनी त्यांचे उजवे हाताने स्विकारली. त्यावेळी मी त्यांना मोजून घेण्यास सांगितले असता त्यांनी ठिक आहे असे म्हणुन ती लाचेची रक्कम त्यांचे शर्टचे डावे खिशात ठेवली. त्यानंतर तलाठी मुरकुटे यांनी मला सर्कल ऑफिसर तांबे यांच्या केबिनकडे जाण्याचा हाताने इशारा केला. म्हणुन मी सर्कल तांबे यांच्या केबिनमध्ये गेलो. त्यावेळी माझे काम पुर्ण केलाय असे बोलुन मी त्यांचे आभार मानले असता, सर्कल तांबे यांनी पैशाबाबत हाताच्या बोटाने खुणावले. तेव्हा मी लाचेची रक्कम रू. ४०००/- माझे

(अब्दुल लतीफ काझी)

शर्टचे खिशातुन काढून सर्कल ऑफिसर तांबे यांच्या समोर धरली असता ती त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने स्विकारून त्यांचे शर्टचे डावे खिशात ठेवली. त्यानंतर मी व पंच नं. १ इंदुलकर असे कार्यालयाचे बाहेर येवून मी सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा म्हणून माझा डावा हात वारंवार माझे डोक्यावरून फिरवून इशारा केला. त्यानंतर सापळा पथकाने सर्कल ऑफिसर तांबे व तलाठी मुरकुटे यांना लागलीच कार्यालयात १६.५९ वाजता ताब्यात घेतले व सर्कल ऑफिसर तांबे यांचेकडुन लाचेची रक्कम रु. ४०००/- तसेच तलाठी मुरकुटे यांचेकडुन लाचेची रक्कम रु. २०००/- पंचाचे समक्ष जप्त केली. त्यानंतर मी पोनि कदम यांच्या सुचनेवरुन कार्यालयाचे बाहेर जावून थांबलो.

काही वेळानंतर पोनि कदम यांनी मला कार्यालयातील सर्कल ऑफीसर तांबे यांचे रूममध्ये बोलावुन काळया रंगाचे कपडयाने कृत्रिम अंधार करून माझ्या हातांची अल्ट्राव्हायोलेट दिव्याखाली तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताच्या अंगठ्यासह सर्व बोटांचे पेरांना व शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशाच्या आतील भागास व खिशाचे वरील कडेला ॲन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. पंच नं. १ इंदुलकर यांनी माझी अंगझडती घेतली. त्यामध्ये सापळा कारवाईचे पुर्वी होत्या तशा वस्तु मिळुन आल्या. पोनि यांनी मला हात धुण्यास सांगितले त्याप्रमाणे मी हात धुतले व सर्कल ऑफीसर तांबे यांच्या रूममध्ये गेलो. सापळा कारवाई दरम्यान तलाठी मुरकुटे यांनी माझे तुरळ येथील जमिनीचे फेरफार व सातबारा उतारा यांची दिनांक १६/०७/२०१९ रोजी संगणकाव्दारे काढलेली प्रत त्यावर तलाठी तुरळ म्हणुन तलाठी मुरकुटे यांची सही असलेली कागदपत्रांची झेरॉक्स प्रत काढुन पोनि कदम यांनी ताब्यात घेतली.

तरी १) श्री. अजय यशवंत तांबे, सर्कल ऑफीसर, मंडळ कार्यालय मुरडव, आरवली, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी २) श्री. विश्वंभर पंडीत मुरकुटे, तलाठी सजा तुरळ, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांनी माझ्या मयत आईचे नांव वडीलोपार्जीत जमीनीचे सातबारा उताऱ्यावरुन कमी करुन सदर जमीनीचे सातबारा उताऱ्यावर माझे व माझा मयत भाऊ याच्या वारसांची नावे नोंद करण्यासाठी सर्कल ऑफीसर श्री. तांबे यांनी ४,०००/- रुपये व तलाठी श्री. मुरकुटे यांनी २,०००/- रुपये लाचेची मागणी केली. तसेच मागणी केलेली लाचेची रक्कम सर्कल ऑफीसर तांबे व तलाठी मुरकुटे यांनी दिनांक १६/०७/२०१९ रोजी १६.५९ वाजताचे सुमारास मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालय मुरडव, आरवली ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी येथे माझेकडुन पंचासमक्ष स्वतःचे फायद्याकरीता कायदेशीर मेहनतान्याखेरीज पारितोषण म्हणून स्विकारली म्हणून माझी त्यांचेविरुध्द तक्रार आहे.

माझा फिर्यादी जबाब मराठीत संगणकावर टंकलिखित केला असून तो मला वाचून दाखविला व समजावुन सांगितला तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

( प्रविण कदम )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

हे लिहुन दिले

( अब्दुल लतीफ काझी )